**CHANDRAPUR FOREST ACADEMY OF ADMINISTRATION, DEVELOPMENT AND MANAGEMENT, CHANDRAPUR**

# चंद्रमा

Issue 07 | September 2022



A cavalcade of courage, discipline, bravura and endurance to protect the wild marched in front of the academy main building incarnated as the STPF troupes (Special Tiger Protection Force) from different tiger reserves of Maharashtra and Kerala. National level celebrations on the occasion of Global Tiger Day changed the academy campus into a vibrant array of multiple programs and events held on the day. Most spectacular was the march past by the forest soldiers. Monsoons rocked the campus and life sprang out of every nook and corner. Forest Guards from Central Chanda Division based in tiger conflict areas were trained for mob-management, protocols to dispose, rescue and handle wildlife. Well known conservationist journalist Ms.Prerna Bindra had a session on relocation issues of TATR. Several people were trained for a day and some for three days under District Administrative Training Institute in the campus. Most significant was the resurrection of erstwhile 'old hostel' into 'Aranyak' to house a batch of forty eight future pivots, the Forest Range Officers (FROs) for next eighteen months of their induction training to be held at Chandrama. The batch brought cheers to the campus with young blood and enthusiasm flooding the avenue. September is a colorful month. A month of butterflies, festivals and jollity all over. More about this as you read this September issue of Chandrama...

**- Team Chandrama**

## मुखपृष्ठाबाबत

## फुलपाखरु



Common Jezebel

ऋतूनुसार कमीजास्त होत असली तरी फुलपाखरं दिसतात मात्र वर्षभर. पावसाळा सुरू होतो. गवत, झाडं-झुडूपं, सारं हिरवंगार होतं. या हिरव्या पानांवर फुलपाखरं अंडी घालतात. फुलपाखराच्या अळीला या पानांचं अमाप लुसलुशीत खाद्य मिळतं. अळ्या वाढतात, कोषात जातात आणि एखाद्या सुंदर सकाळी फुलपाखराचा जन्म होतो. अशी हजारो फुलपाखरं जन्माला येतात. एव्हाना वर्षा ऋतू ऐन बहरात येऊन उतरणीला लागलेला असतो. पावसाची झड थांबून वारंवार सूर्यदर्शन होऊ लागतं. सा-या हिरवाईवर फुलं लगडलेली असतात आणि फुला-फुलावर फुलपाखरं भिरभिरतात. असं वाटतं देवाजीच्या बागेतल्या अवघ्या फुलांना पंख फुटून स्वर्गीय रंग मिरवत ही फुलंच रुंजी घालतात. अवतीभवती लाल-निळ्या, काळ्या-पिवळ्या, हिरव्या-पांढ-या रंगांची पखरण. हवेवर स्वार होऊन अलगद हे देवदूत एखाद्या लडिवाळ फुलावर अलगद उतरतात. त्यातील कणभर मकरंद पिऊन पुन्हा दुस-या फुलाकडे. कुठं स्वार्थ नाही, मोह नाही. निर्मल, निर्व्याज जीवन. न कुणाचा शाप, ना कसला पाश. या उन्मुक्तांचा हा स्वच्छंद विहार पाहिला की वेल्हाळ मन त्यांचाच ठाव घेत राहतं. कधीतरी वाचलेली, ऐकलेली कविवर्य बोरकरांची रचना जणू साकार होते.

**‘नाही पुण्याची मोजणी, नाही पापाची बोचणी, जिणे गंगौघाचे पाणी**
**कशाचा न लागभाग, कशाचा न पाठलाग, आम्ही हो फुलांचे पराग**
**आम्हा नाही नामरूप, आम्ही आकाशस्वरूप, जसा निळा -निळा धूप ’**

या निर्मल जीवांसाठी देवा काही खूप करू शकलो नाही, तरी किमान त्यांचा नाश होईल असं काही आमच्या हातून घडू नये, इतकी आमची सद्बुद्धी तू कायम जागी ठेव.

**- पियुषा प्रमोद जगताप, शतानिक भागवत**

# Center of Excellence for Human Wildlife Interface, Conflict Mitigation and Management



A session was conducted involving all stakeholders of voluntary relocation initiative on the topic of, ***Moving for tigers: Insights from voluntary relocations of villages from Tadoba-Andhari Tiger Reserve.*** It was a fruitful delivery followed by discussions by Ms. Prerna Bindra, a renowned conservationist and journalist. Officers from TATR, Zilla Parishad and local communities participated in the event.

## 'मानव-वन्यजीव संघर्ष व जमाव व्यवस्थापन प्रशिक्षण'

### दिनांक १० ते १२ ऑगस्ट, २०२२

या प्रशिक्षणाचा उद्देश त्याच्या नावामध्येच दडलेला आहे. चंद्रपूर म्हटलं की समोर दिसतात वाघ, बिबट व त्यांच्यामुळे निर्माण होणारा मानव–वन्यजीव संघर्ष. मानव –वन्यजीव संघर्ष होतो तेव्हा तेथे गोळा होणारे लोक हा खूप मोठा अडथळा कोणत्याही वन्यप्राणी बचाव संघासमोर उभा राहतो. हा जमाव योग्य रितीने हाताळून त्याचा योग्य ते व्यवस्थापन करता यावा, याकरीता हे प्रशिक्षण घेण्यात आलं. प्रशिक्षणाची सुरूवात मध्य चांदा वन विभागातील वनरक्षकांपासून करण्यात आली आहे. प्रशिक्षण दिनांक १० ते १२ जून, २०२२ या ३ दिवसांमध्ये पार पडले.

या ३ दिवसामध्ये पहिल्या दिवशी राष्ट्रीय वन्यजीव संवर्धन मंडळाच्या मार्गदर्शक सूचना, संघर्ष स्थळावरील महत्वाच्या कायदेशीर बाबी तसेच जमाव व्यवस्थापनातील तांत्रिक बाबी हे सर्व विषय हाताळले गेले.


दुसऱ्या दिवशी क्षेत्रिय दौऱ्यादरम्यान वन्यप्राणी बचाव केंद्र, गोरेवाडा, नागपूर येथे भेट दिली. तेथे डार्ट गन कशा पद्धतीने वापरावी याचे प्रात्यक्षिक तसेच वन्यप्राण्यांकरीता संघर्ष स्थळावर पिंजरा लावला जातो तो कशा पध्दतीने लावावा? वन्यप्राणी त्या पिंजऱ्यामध्ये पकडला जाण्यासाठी कशा पध्दतीने नैसर्गिक वातावरण निर्माण करावे? याचे प्रात्यक्षिक देण्यात आले तसेच वन्यप्राण्यांच्या पाऊल खुणांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

तिसऱ्या दिवशी मानव-वन्यजीव संघर्षाची कारणे व उपाययोजना, गर्दीच्या ठिकाणी घ्यावयाची काळजी तसेच घटनास्थळाचा अनुभव (प्रात्यक्षिक) घेण्यात आले.





प्रशिक्षणाकरीता मध्य चांदा वनविभागातील एकूण ५६ प्रशिक्षणार्थी वनरक्षक उपस्थित होते. सदर प्रशिक्षणाबाबतचे दैनंदिन अभिप्राय आभासी पध्दतीने जतन केले जातात.



# Global Tiger Day Celebrations in Chandrapur

**Chandrapur(Maharashtra):** A global celebration of India's National Animal, the tiger, was marked in Chandrapur on 29th July 2022 in the presence of Shri Bhupender Yadav, Honourable Minister, Environment, Forest and Climate Change and Shri Ashwini Kumar Chaubey, Minister of State, Environment, Forest and Climate Change. The national level event was held at the Chandrapur Forest Academy of Administration, Development and Management, Chandrapur, Maharashtra.

Besides the honourable ministers, directors of Tiger Reserves from across the country, officials from the Ministry of Environment, Forest and Climate Change, and Maharashtra's Chief Wildlife Warden attended the event. The Special Tiger Protection Force from Tiger Reserves of Maharashtra, namely, Tadoba-Andhari, Melghat, Pench and Navegaon Nagzira, along with a contingent of Kerala Forest Department paraded showcasing their regimented discipline essential as a strike force to combat wildlife crime.

An award distribution ceremony for the frontline staff was held, recognising staff for their extraordinary commitment in the field. One of the eight awardees is Shri Ganesh M, Beat Guard from Periyar Tiger Reserve, Kerala who heads the combat team VIPER and is highly skilled in wildlife crime investigation. He also saved a tourist's life, carrying them 15 km to safety. A forester from Kanha Tiger Reserve, Madhya Pradesh, Shri Meru Singh Mehrape, was awarded for contribution to wildlife crime control and successful persecution of poachers. He also played a pivotal role in the voluntary relocation of 438 families from Kanha. Another forest watcher from Kanha, Shri Jodha Singh Baiga, was awarded for his work in the protection and documentation of barasingha—the state animal—and their successful translocation to Satpura Tiger Reserve. Shri Anil Kumar Chauhan, Forest Guard from Satpura Tiger Reserve, Madhya Pradesh was awarded for his role in developmental activities in eight relocated villages, and in helping provide for livelihood opportunities. This was facilitated by his serving as Secretary of Village Development Committee over a period of seven years. Three antipoaching watchers from Mudumalai Tiger Reserve, Tamil Nadu - Thiru Bomman, Thiru Madhan and Shri Meena Kalan were jointly awarded for their work in tiger monitoring and handling difficult wildlife conflict situations. Shri Santosh Kumar Sardar, Forester from Sundarban Tiger Reserve, West Bengal was awarded for working dedicatedly in a very remote protection camp, extensive patrolling and providing innovative ideas that have minimised wildlife offences.

The ceremony was followed with a speech by the Chief Guest, Shri Bhupender Yadav. He congratulated all Tiger Range Countries, and commended India in particular for setting a benchmark in conservation by protecting more than 70% of global tiger population. He said that the Government of India has demonstrated its commitment to tiger conservation by increasing tiger reserve numbers from initial nine in 1973 to 52 currently, the latest being Ramgarh Vishdhari from Rajasthan. He informed the gathering that the government is equally committed towards the well-being of the people who inhabit these tiger bearing landscapes through various livelihood opportunities. In this regard, he commended Maharashtra for implementing the unique Shyama Prasad Mukharji Jan Van Vikas Yojana which provides for






schemes for the welfare of people in and around tiger reserves.

The programme concluded with a formal vote of thanks by Dr. Satya Prakash Yadav Additional Director General (Project Tiger) and Member Secretary (National Tiger Conservation Authority).

The Global Tiger Day celebration was followed with 21st meeting of the board of the National Tiger Conservation Authority. Dr. S. P. Yadav informed the gathering that the progress of 5th cycle of All India Tiger Estimation and Management Effectiveness Evaluation is satisfactory. The members shared their experiences of visiting tiger reserves as were designated in the 20th meeting. The Members also discussed the scope of work for scientific cell that was proposed in 20th meeting. Other points that came up for discussion were the documentation of research work in the past financial year, easing release of fund flow and the procurement of vehicles. The necessity of deploying a Special Tiger Protection Force in Assam was also asserted.

Subsequently, Field Directors of tiger reserves from across the country got an opportunity to participate in an open house interaction with the honourable Union Ministers, in which they shared their achievements, best practices and concerns.

The celebrations concluded with all delegates and invites renewing their pledge to work for the protection of the tiger, and for the welfare of communities living in the landscape of the tiger.









# नव्याने भरती झालेल्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचे नियुक्तीपूर्व प्रशिक्षण

स्पर्धा परीक्षेतून नव्याने निवड झालेल्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचे नियुक्तीपूर्व प्रशिक्षण आयोजित करण्याकरीता वन प्रशिक्षण संचालनालय, डेहराडून यांचेकडून चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनीस मान्यता देण्यात आली. त्या अनुषंगाने आता महाराष्ट्रात कुंडल प्रबोधिनी बरोबरच चंद्रपूर वन प्रबोधिनी येथे देखील नवनियुक्त वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचे १८ महिने कालावधीचे प्रशिक्षण घेण्यात येईल.

सन १९६१ साली राज्य शासनाने नवनियुक्त वनपाल संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी चंद्रपूर येथे वनपाल प्रशिक्षण केंद्राची निर्मिती केली होती. सदर प्रशिक्षण कार्यक्रम १९७५ पर्यंत अंमलात होता. सन १९७६ साली भारत सरकारद्वारे संस्था अधिग्रहीत करुन त्याठिकाणी विविध राज्यातील नवनियुक्त वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी मध्यवर्ती वनराजिक महाविद्यालय स्थापन करण्यात आले होते. त्यानंतर या महाविद्यालयात १९९० पर्यंत वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गाचे प्रशिक्षण घेण्यात येत होते. मात्र १९९० मध्येच भारत सरकारने सदर प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र राज्य सरकारला स्थापत्य बांधकामासह हस्तांतरीत करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. सन १९९१ पासून सदर केंद्राचा राज्य सरकारद्वारे वन विभागाच्या राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उपयोग सुरू आहे. सन २०१३ मध्ये या मध्यवर्ती वनराजिक महाविद्यालयाचे नामकरण चंद्रपूर वनप्रशिक्षण संस्था असे करण्यात आले. सन २०१४ मध्ये प्रशिक्षण संस्थेचे वन प्रबोधिनीमध्ये रुपांतर करुन त्यास स्वायत्तता देण्यात आली.

आता नव्याने भरती झालेल्या ४८ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचे १८ महिने कालावधीचे प्रशिक्षण नुकतेच दि. २२ ऑगस्ट २०२२ पासून चंद्रपूर वन प्रबोधिनीमध्ये सुरु झाले आहे. यात महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, हिमाचल प्रदेश व मिझोराम या चार राज्यांमधील प्रशिक्षणार्थ्यांचा समावेश आहे. वन विभागातील क्षेत्रीय कामकाज, वनांशी संबंधीत अनेक विषयांचा अभ्यास या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये करणे अपेक्षीत असते. याच बरोबर अनेक क्षेत्रीय दौऱ्यांचे आयोजन करुन उत्तर भारत, मध्य भारत, दक्षित भारत व ईशान्य भारतातील विविध वनक्षेत्रे, अभयारण्ये इत्यादींना प्रत्यक्ष भेटी देवून वन व वन्यजीव व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

हे प्रशिक्षणार्थी वन परिक्षेत्र अधिकारी सदरचे प्रशिक्षण पूर्ण करुन वनविभागात काम करतील. याकरीता आवश्यक ती पूर्वतयारी या प्रशिक्षणाच्या माध्यमातून करण्यात येते. प्रदीर्घ कालावधीनंतर चंद्रपूर वन प्रबोधिनीमध्ये आयोजीत केलेला हा प्रशिक्षण कार्यक्रम उत्तमरीत्या यशस्वी करण्याचा प्रबोधिनीचा मानस आहे.





# मुक्त विद्यापीठासोबत सहयोग करार

चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील दुर्गम व आदिवासी भागात राहणाऱ्या युवकांना रोजगाराभिमुख कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासमवेत प्रबोधिनीचा शैक्षणिक सहयोग करार होणार आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथील व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. अनिल कुळकर्णी, अमरावती येथील विभागीय केंद्राचे संचालक व विद्वत परिषद सदस्य डॉ. संजय खडक्कार आणि नागपूर विभागीय केंद्राचे संचालक प्रा. इंगळे यांनी वन प्रबोधिनीला सदिच्छा भेट दिली. यावेळी वन प्रबोधिनीचे संचालक, अपर प्रधान मुख्य वन संरक्षक महिप गुप्ता यांच्या समवेत मुक्त विद्यापीठाच्या चमूने चर्चा केली.

प्रशिक्षण, शिक्षण, संशोधन व विकास आणि विस्तार योजना अशी वन प्रबोधिनीची मुलभूत ध्येये निश्चित करण्यात आली आहेत. वन, वन्यजीव, पर्यावरण आणि वातावरण बदल या चार विषयांवर विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. विस्तार योजनेंतर्गत वनप्रदेशातील आदिवासी, गावकरी, युवक व युवती यांना कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्याची तरतूद वन प्रबोधिनीच्या उद्दीष्टांमध्ये केलेली आहे. त्यामुळे आगामी काळात वनोत्पादनांवर प्रक्रिया करून विविध वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देण्याची तयारी वन प्रबोधिनी करीत आहे. त्यासाठी मुक्त विद्यापीठ हे त्या आदिवासींपर्यंत पोचण्याचे मोठे साधन ठरणार आहे, असे महिप गुप्ता यांनी नमूद केले.

मुक्त विद्यापीठाला संपूर्ण महाराष्ट्रात विविध उपक्रम राबवता येतात. अगदी आदिवासी पाड्यांपर्यंत मुक्त विद्यापीठाचे जाळे पसरले आहे. त्यामुळे वनोत्पादनांवर आधारित कौशल्य विकासाचे अल्पकालीन अभ्यासक्रम मुक्त विद्यापीठामार्फत आदिवासी युवकांपर्यंत पोचवता येणार आहेत. म्हणून वन प्रबोधिनी व मुक्त विद्यापीठ यांच्यात शैक्षणिक सहयोग करार झाल्यास तो महाराष्ट्राच्या विकासासाठी मोठे पाऊल ठरेल, असे अनिल कुळकर्णी यांनी



नमूद केले. तर मुक्त विद्यापीठात पर्यावरण, हवामान बदल आणि वनांवर आधारित काही अभ्यासक्रम तयार आहेत. त्या अभ्यासक्रमांची रूपरेषा बघून नवे अभ्यासक्रम अथवा त्याच अभ्यासक्रमांना वन प्रबोधिनीमार्फत राबवता येतील काय त्यावर निश्चितपणे चर्चा करता येईल. या दोन्ही संस्थांची संयुक्त समिती स्थापन करून अभ्यासक्रम विकसित करता येतील, असे डॉ. संजय खडक्कार म्हणाले.

मुक्त विद्यापीठाच्या चमूने वन प्रबोधिनीच्या साधन सुविधांची पाहणी केली. चंद्रपूरात इतक्या उच्च दर्जाच्या साधन सुविधा असल्याबाबत त्यांनी आनंद व्यक्त केला. गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया व भंडारा या चार जिल्ह्यातील युवकांनासाठी या प्रबोधिनीतही काही नवीन अभ्यासक्रम सुरू करता येतील, असेही चमूने यावेळी नमूद केले.

## राज्य प्रशिक्षण धोरण अंतर्गत
# जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (DATI) कार्यक्रम

सन २०१४-१५ पासून राज्य प्रशिक्षण धोरणास अनुसरून यशदा, पुणे अंतर्गत चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर ही जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर (DATI) म्हणून कार्यरत आहे. या प्रशिक्षण संस्थेमार्फत चंद्रपूर जिल्ह्यातील विविध विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम करीत आहे. त्या अनुषंगाने वर्ग-३ कर्मचाऱ्यांकरीता तीन दिवसीय उजळणी प्रशिक्षणांची दोन सत्रे दि. ४.८.२०२२ ते दि. ६.८.२०२२ आणि दि. २४.८.२०२२ ते दि. २६.८.२०२२ या कालावधीत पार पडली. प्रशिक्षाणादरम्यान या प्रशिक्षणार्थ्यांकरीता ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर येथे क्षत्रिय दौरा आयोजीत करण्यात आला. याबरोबरच दि.१९.८.२०२२ व दि. २३.८.२०२२ रोजी एक-एक दिवसांचे प्रशिक्षण कार्यक्रमदेखील आयोजित करण्यात आले.



# वृक्षारोपण भगवंताचे कार्य - वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, जॉगर्स पार्क विकसित करणार

कोणतेही जनआंदोलन अथवा सामाजिक कार्य जनतेच्या सहकार्याशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. आज वायुप्रदूषणासारख्या समस्येला हाताळण्यासाठी वृक्षारोपण हाच एकमेव उपाय आहे. तेव्हा वृक्षारोपण हे भगवंताचे कार्य आहे, असे समजून त्यात सहभागी व्हावे, असे आवाहन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

चंद्रपूर वन प्रबोधिनीच्या जॉगर्स पार्क येथे वन प्रबोधिनी व आयएमएच्या वुमन्स विंगतर्फे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते वडाच्या झाडाची लागवड करण्यात आली. आयएमएच्या वुमन्स विंगने ७५ स्मार्ट प्लांटेशन या संकल्पनेवर वृक्षारोपण केले. या वृक्षांची निगा व देखभाल आयएमएच्या वुमन्स विंगतर्फे करण्यात येणार आहे. तसेच आगामी काळात आणखीन असे उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

याप्रसंगी बोलताना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, यापूर्वीच्या काळात वनमंत्री असताना राज्यात विक्रमी वृक्षारोपणाची मोहिम हाती घेण्यात आली होती. प्रत्येक गावात व शहरातील नागरिकांनी त्या मोहिमेत उस्फूर्त सहभाग घेतला. समाजातील प्रत्येक घटकाच्या सहभागाशिवाय कोणतीही मोहिम यशस्वी होत नाही. महिलांनी पुढाकार घेत स्मार्ट प्लांटेशन ही संकल्पना मांडली आहे, हे अभिनंदनीय आहे. कोरोना काळात ऑक्सिजन सिलींडरचा तुटवडा होता, त्यावेळी वृक्षांकडून मोफत मिळणाऱ्या प्राणवायूची किंमत सगळ्यांना कळाली. त्यामुळे ही मोहिम आता आणखीन विस्तृत झाली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



नागरिकांना सकाळी मोकळ्या वातावरणात फिरण्याचा आनंद घेता यावा यासाठी जॉगर्स पार्क अधिक विकसित होणे आवश्यक आहे. या पार्कच्या विकासासाठी आवश्यक असणारा निधी देण्यात येईल. तेव्हा या पार्कच्या विकासासाठीची योजना वन प्रबोधिनीने आयएमएच्या सहभागाने तयार करावी, नागरिकांच्या सूचना त्यात असाव्यात, असे वनमंत्री म्हणाले.

या कार्यक्रमाला मुख्य वन संरक्षक प्रकाश लोणकर, महापालिकेचे आयुक्त राजेश मोहिते तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव थाटात साजरा

चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी येथे स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव थाटात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनी चंद्रपूर वन प्रबोधिनीचे संचालक अपर प्रधान मुख्य वन संरक्षक महिप गुप्ता यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

प्रारंभी मेस्कोच्या सुरक्षा रक्षकांनी संचालक महिप गुप्ता यांना मानवंदना दिली. यावेळी प्रबोधिनीच्या स्वागत कक्षात भारत मातेची सुंदर प्रतिमा उभारण्यात आली होती.



## वन प्रबोधिनीत सद्भावना दिन साजरा

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त चंद्रपूर वन प्रबोधिनी येथे राष्ट्रीय सद्भावना दिन साजरा करण्यात आला. यावेळी सद्भावना शपथ घेण्यात आली.

प्रबोधिनीचे संचालक अपर प्रधान मुख्य वन संरक्षक महिप गुप्ता यांनी स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. याप्रसंगी वन प्रबोधिनीतील अधिकारी व कर्मचारी यांनी सद्भावना शपथ घेतली.



# सामूहिक वनहक्क

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम २००६ अन्वये वैयक्तिक व सामूहिक वन हक्क कोणते याचे विवरण देण्यात आले आहे. वनात राहणाऱ्या अनुसूचित जमातींचा व अन्य परंपरागत जंगलवासींचा संबंधित वन जमिनीवर १३ डिसेंबर २००५ पूर्वी कब्जा असला पाहिजे व सदर कायदा अंमलात येण्याच्या तारखेस (३१ डिसेंबर २००७) प्रत्यक्ष ताबा असला पाहिजे या अटीवर कलम ४ (६) नुसार वैयक्तिक वन हक्क मान्य केले जातात.

याच कायद्यात अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी या समूहाचे सामूहिक हक्क मान्य केले जातात.

**वनहक्क कलम ३**

**सामूहिक वनहक्क :**

(बी) कोणत्याही नावाने संबोधले जाणारे निस्तार सारखे आणि जुन्या राजे राजवाडे,जमीनदारी किंवा इतर कारणास्तव वापरात असलेले अधिकार.

(सी) गावाच्या हद्दी मधील किंवा बाहेरील परंपरेने गोळा करीत आलेले गौण वनोपजावरील मालकीचा, ते गोळा करण्याचा आणि त्याची विल्हेवाट लावण्याचा अधिकार.

(डी) मासे आणि जलाशयातील इतर जीव मिळविण्याचे व वापरण्याचे,भटक्या किंवा धनगर जमातींचे गुरे चारण्याचे (स्थिर किंवा फिरते दोन्ही ) आणि पारंपारिक हंगामी संसाधने मिळविण्याचे व वापरण्याचे, यासारखे अन्य सामुदायिक अधिकार.

(ई) आदिम जमाती व ( शेती पूर्व समूह ) यांचा वस्ती करण्याचा अधिकार.

(के) जैवविविधता उपलब्धतेचा व जैवविविधता आणि सांस्कृतिक विविधता यांच्या संदर्भातील बौद्धिक संपदेचा आणि पारंपारिक ज्ञानाचा सामुदायिक अधिकार.

(एल) वरील (बी) पासून (के) पर्यंत नमूद केलेल्या अधिकारात समाविष्ट नसलेले परंतु वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी पारंपारिकरित्या उपभोगत असलेले इतर कोणतेही अधिकार, मात्र त्यात कोणत्याही प्रजातीच्या वन्य जनावरांची शिकार करणे किंवा त्यांना पकडणे किंवा त्यांच्या शरीराचा कोणताही भाग काढणे या अधिकाराचा समावेश असणार नाही.

गौण वनोपज – म्हणजे इमारती लाकडांव्यतिरिक्त सर्व वनस्पतीजन्य वनोपज ज्यात बांबू, ब्रशवूड, खुंट, वेत, टसर, कोष, मध, मेण, लाख, तेंदूपत्ता, औषधी वनस्पती, मुळे, कंद आणि तत्सम यांचा समावेश होतो.

**वरीलप्रमाणे सामूहिक वनहक्क मान्य केले जातात आणि असे हक्कधारकांचे त्याप्रती असणारे कर्तव्य पालन होत नसल्याचे किंबहुना त्याबद्दल दखल घेतली जात नसल्याचे प्रकर्षाने आढळून येते.**

**वनहक्क धारकांचे कर्तव्य– कलम ५.**

कोणत्याही वनहक्काचे धारक आणि ज्या क्षेत्रात असे धारक आहेत तेथील ग्रामसभा व गावपातळीवरील संस्था यांना खालील प्रमाणे अधिकार प्रदान केले आहेत.

(ए) वन्यजीव,वने आणि जैवविविधतेचे रक्षण करणे.

(बी) नजीकची पाणीसाठा क्षेत्रे,पाण्याचे स्त्रोत आणि पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचे पुरेसे संरक्षण होत आहे याची दक्षता घेणे.

(सी) त्यांच्या सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाला धक्का पोचविणाऱ्या विध्वंसक प्रथांपासून अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासींचे वसतिस्थानांचे, रक्षण होईल याची खबरदारी घेणे.

(डी) सामुदायिक वन संसाधनाच्या वापरावरील नियंत्रणाबाबत आणि वन्यजीव, वन व जैवविविधतेवर विपरित परिणाम होईल अशी कृत्ये थांबविण्याबाबत ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयाचे पालन होईल याची खबरदारी घेणे.

**ग्रामसभेचे कर्तव्य नियम २०१२**

(ई) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) सुधारित नियम २०१२ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम २००६ चे कलम ५ अंतर्गत तरतूदीचे वहन करण्यास वन्यप्राणी, वने आणि जैवविविधतेचे संरक्षण करण्यास ग्रामसभेतील सदस्यांची समिती गठित करणे.

(एफ) उपरोक्त गठित समिती, अशा सामुदायिक वन संसाधनाचा, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना सातत्याने व बरोबरीने लाभ उपलब्ध होण्याकरिता, संवर्धन व व्यवस्थापन आराखडा तयार करेल जो वन विभागाचा सूक्ष्म आराखडा किंवा कार्य आयोजना किंवा व्यवस्थापन आराखड्याशी समितीने सुचविलेल्या आवश्यक सुधारणासह समाकलीत (Integrated) असेल. यावर ग्रामसभेची देखभाल व नियंत्रण असेल.

**महाराष्ट्रातील अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना मान्य केलेल्या सामूहिक हक्काचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे ग्रामसभेने त्वरित बनविणे अपरिहार्य आहे.**

**– संजय म. जगताप**
निवृत्त वन अधिकारी

# 'चंद्रमा'तील वनक्षेत्रपाल प्रशिक्षणार्थ्यांची
# पहिली निसर्गसहल

आम्ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वनसेवा परीक्षा, २०१९ अंतर्गत वनपरिक्षेत्र अधिकारीपदी निवड झाल्यावर चंद्रपूर वन अकादमी, म्हणजेच 'चंद्रमा' मध्ये दीड वर्षाच्या प्रशिक्षणासाठी दि. २२ ऑगस्ट २०२२ रोजी दाखल झालो. एका आठवड्याने आमच्या कोर्स डायरेक्टर श्रीमती पियुषा जगताप मॅडम (भा.व.से.) यांनी आम्हाला शनिवारी चंद्रपूरातीलच माणिकगड (जीवती वनपरिक्षेत्र) येथे आमच्या पहिल्या वनक्षेत्र निरीक्षणासाठी नेले. श्रीमती पियुषा जगताप मॅडम, श्री दहिवले सर (भा.व.से.), श्री श्रीकांत पवार सर (सहाय्यक वनसंरक्षक), श्री रुंदन कातकर सर (वनपरिक्षेत्र अधिकारी) व इतर स्थानिक अधिकाऱ्यांनी सकाळपासून दुपारपर्यंत आम्हाला विविध वृक्ष, पशू, पक्षी दाखवून त्याबद्दल सखोल माहिती दिली. सर्व पाहून झाल्यावर दुपारच्या स्वादिष्ट जेवणाची सोय अकादमीतर्फे माणिकगडाच्या पायथ्याशीच करण्यात आली होती. जेवण झाल्यावर वडसारी वनपरिक्षेत्रातील वन विभागाची हद्द दर्शवणारे फॉरेस्ट बीम पाहिले, आणि त्याबद्दल आवश्यक ती माहिती घेतली.

फॉरेस्ट पिलरचे महत्व जाणून घेतल्यावर तिथून जवळच असणाऱ्या अमलनाला तलाव व गार्डन येथे भेट द्यायला आम्ही सर्व रवाना झालो.

वर उजव्या कोपऱ्यातील फोटोमागे एक खूप इंटरेस्टिंग घटना आहे. त्यात काही बहुमोलाची शिकवण आहे, जी सध्या अन्य विभागांमध्ये पाहायला मिळणे दुरापास्त आहे, पण आमच्या महाराष्ट्र वनविभागात मात्र ती आजही कटाक्षाने पाळली जाते, हे पाहून आम्ही अक्षरश: भारावून गेलो !

तर, घटना अशी आहे, की त्या फोटोतील मोबाईलवर बोलताना दिसणारे व्यक्ती म्हणजे माणिकगड वनक्षेत्र भेटीचे मार्गदर्शक सहाय्यक वनसंरक्षक श्री. श्रीकांत पवार सर आणि अन्य तरुण म्हणजे कर्तव्यावर असणारे फॉरेस्ट गार्ड.

वन विभागाद्वारे व्यवस्थापन केल्या जाणाऱ्या, इको टुरिजमचं उत्तम उदाहरण असणाऱ्या, अमलनाला तलाव व गार्डनच्या ठिकाणी आम्ही सर्वजण भेट देऊन निरीक्षण करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबतच प्रवेशद्वारावर पोहचलो असता प्रवेशपत्राविना आत जाऊ दिले नाही, जोपर्यंत त्या वनरक्षक तरुणाला त्यांचे बॉसने स्वतः कॉल वरून तसा आदेश दिले नाहीत! म्हणजेच,



तसा आदेश आपल्या बॉसकडून येईपर्यंत त्या वनरक्षकांनी आम्हां सर्वांना तिथेच खिळवून ठेवलं, अन तेही विनम्रपणे !

त्या तरुण फॉरेस्ट गार्डची कर्तव्यदक्षता, प्रामाणिकपणा आणि निर्भयता पाहून संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुद्धा त्या वनरक्षकांची स्मितहास्यासह प्रशंसाच केली !

या घटनेत नमूद श्रीमती पियुषा जगताप मॅडम, श्री दहिवले सर, श्री पवार सर व फॉरेस्ट गार्ड कर्मचारी यांच्यात असलेल्या व्यावसायिकते (प्रोफेशनालिजम) बद्दल त्या सर्वांना आमच्याकडून सलाम !

अशीच घटना इतिहासात श्रीशिवछत्रपती आणि प्रवेशद्वारावर पहरेदारी करणाऱ्या सैनिकात घडली होती आणि तेव्हा महाराजांनी त्या सैनिकाचा दरबारात बोलावून यथोचित सन्मान केला होता !

ह्या घटनेतून आम्ही घेतलेली शिकवण :

१) नियम म्हणजे नियम !

२) कोणासही सूट नाही !

३) महाराष्ट्राची प्रगल्भता अपरंपार !

**– श्री शिवाजी नागनाथ टोम्पे व**
इतर प्रशिक्षणार्थी वनपरिक्षेत्र अधिकारी, चंद्रमा



# फुलपाखरू एक राष्ट्रीय प्रतीक



जगभरात प्रतीकांना वेगळंच महत्त्व आहे. प्रत्येक देशातील प्रतीके तिथल्या संस्कृतीची, इतिहासाची, जीवन मूल्यांची, भौगोलिक वैशिष्ट्यांची आपल्याला जाण करून देत असतात. कित्येक देशातील प्रतीके ही त्या त्या राष्ट्राच्या मानाचा, अस्मितेचा आणि अभिमानाचा मानबिंदू असतो. प्रतीकातून त्या त्या ठिकाणाच्या मूल्यांची जाण उर्वरित जगाला होते असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

भारतात देखील अनेक गोष्टींची राष्ट्रीय प्रतीके आहेत. वड – राष्ट्रीय झाड, आंबा – राष्ट्रीय फळ, कमळ – राष्ट्रीय फूल, मोर – राष्ट्रीय पक्षी, वाघ – राष्ट्रीय प्राणी इत्यादी.

या प्रतीकात्मक गोष्टींमध्ये फुलपाखराची देखील गणना व्हायला हवी म्हणून भारतातील तमाम फुलपाखरूप्रेमी एकत्र आले. या गोजिरवाण्या, सौंदर्ययुक्त कीटकाला देखील राष्ट्रीय प्रतीकाचा दर्जा मिळावा, म्हणून कोरोनाच्या लॉकडाऊन काळात ही मंडळी वेब मीटिंगच्या माध्यमातून एकत्र आली. यामध्ये जेष्ठ फुलपाखरू संशोधक, शास्त्रज्ञ, अभ्यासक यांनी एकत्र येऊन सविस्तर चर्चा केली. त्यात असं ठरलं की फुलपाखरू राष्ट्रीय प्रतीक ठरवण्यासाठी लोकशाही मार्ग अवलंबावा आणि यातूनच मग फुलपाखरांची निवडणूक घेण्याचं ठरलं!!! मग सविस्तर चर्चेमध्ये संभाव्य राष्ट्रीय फुलपाखराबाबतचे निकष प्रथम ठरवले गेले ते खालील प्रमाणे:–

फुलपाखरू दिसायला अत्यंत सुरेख म्हणजे करिश्माइ असायला हवं. कारण सुरेख रंगसंगती लाभलेली अनेक फुलपाखरे आपल्या अवतीभवती आढळतात. त्यामुळे त्यांनी चटकन लक्ष वेधून घ्यायला हवं.

भारताचे होणारे राष्ट्रीय फुलपाखरू हे सर्वत्र आढळणारे असावे. अति दुर्मिळ नसावं. कारण अतिदुर्मिळ फुलपाखरू सहजासहजी लोकांना दिसणार नाही. सबब त्याच्यातला आपलेपणा निघून जाईल.

गेल्या तीन वर्षात सात राज्यांनी आतापर्यंत आपापली राज्य फुलपाखरे घोषित केलेली आहेत. त्यामुळे ही सात फुलपाखरे सहाजिकच राष्ट्रीय फुलपाखराच्या शर्यतीतून वगळावीत. पीक नष्ट करणाऱ्या फुलपाखरांचा विचार भारताचे राष्ट्रीय फुलपाखरू म्हणून करू नये. तरुण वर्गाला तसेच लहान मुलांना आकर्षित करणारे फुलपाखरू असावं.

फुलपाखरामध्ये ठळकपणे जाणवणारी वैशिष्ट्ये असावीत. उदा. उडण्याची लकब, रंगसंगती, विशिष्ट सवयी हे वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळे त्याचा ठळकपणा जाणवेल. फुलपाखराच्या नर व मादी मध्ये जास्त फरक नसलेले फुलपाखरू असावं. निकषांमध्ये बसणाऱ्या प्रजातीच्याच फुलपाखराची नावे सुचवण्यास फुलपाखरू तज्ञांना सांगितले गेलं. या आवाहनाला प्रतिसाद देत भारतभरातील सुमारे पन्नासहून अधिक फुलपाखरांच्या प्रजातींची यादी तयार केली गेली. यातील प्रत्येक प्रजातीच्या फुलपाखरावर सविस्तर चर्चा झाली आणि फुलपाखरू तज्ञ मंडळींनी यातून मग अंतिम सात (७) प्रजाती निवडल्या.

म्हणजेच भारतात आढळणाऱ्या फुलपाखरांच्या एकूण १३२० प्रजातींपैकी सात फुलपाखरांना, भारताच्या राष्ट्रीय प्रतीकाच्या निवडणूकीचे उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले.

त्यांची नावे पुढीलप्रमाणे:–


१) कृष्णा पिकॉक
२) कॉमन जेझेबेल
३) ऑरेंज ओक्लिफ
४) फाईव्हबार स्वॉर्डटेल
५) इंडियन नवाब
६) येल्लो गोरगॉन
७) नॉर्दन जंगल क्वीन

फुलपाखरांच्या या सात प्रजातींमधून, एक राष्ट्रीय फुलपाखरू निवडण्याचं आवाहन भारतातील नागरिकांना करण्यात आलं. या अनोख्या निवडणूकीकरता ११ सप्टेंबर २०२० ते ७ ऑक्टोबर २०२० या सुमारे एक महिन्याचा कालावधी देण्यात आला.

अत्यंत सोप्या पद्धतीने बनवलेल्या गुगल फॉर्ममार्फत नागरिकांना आपलं मत नोंदवण्यास सांगण्यात आलं. ही सचित्र मत पत्रिका अनेकांना आकर्षून घेत होती. यात प्रत्येक उमेदवाराबाबतची फोटोसह माहिती देण्यात आली होती. संपूर्ण भारतातील वर्तमानपत्रे, मासिके, आकाशवाणी, दूरचित्रवाणी इत्यादी प्रसिद्धीमाध्यमातून याबाबतचा प्रसार आणि प्रचार देखील करण्यात आला. त्याचप्रमाणे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप यावरून देखील या गुगल फॉर्मयुक्त मतपत्रिकेची लिंक लोकांना पाठवून ऑनलाईन पद्धतीने मतदान करण्याचं आवाहन केले गेले.

सुमारे ६०,००० हून अधिक पर्यावरणप्रेमी नागरिकांनी आपल्या पसंतीच्या फुलपाखरासाठी मतदान केलं. या मतांची गणना करून सविस्तर अहवाल सरकारला पाठवण्यात आला. अनुक्रमे सर्वात जास्त मतं मिळालेल्या पहिल्या तीन प्रजातींची नावे पर्यावरण मंत्रालय नवी दिल्ली यांच्याकडे रीतसर प्रस्तावासह पाठवण्यात आली. त्याकरता एक पुस्तिकादेखील बनवण्यात आली असून त्यामध्ये याबाबतच्या सर्व नोंदी सविस्तरपणे मांडण्यात आलेल्या आहेत.

स्वतंत्र भारतामधील कोणतेही राष्ट्रीय प्रतीक ठरवण्यासाठीचा, लोकशाही मार्गाने अंगीकारलेला हा पहिलाच प्रयत्न असावा. या मतदान प्रक्रियेमुळे अनेक गोष्टी साध्य झाल्या. अख्या देशभरात फुलपाखरू प्रसार आणि प्रचाराची एक चळवळच उभी राहिली. अनेक शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी, पर्यावरणप्रेमी संस्थांनी, सुजाण नागरिकांनी, फुलपाखरू अभ्यासकांनी फुलपाखरू निवडीबाबत अत्यंत उत्साहाने आणि हिरीरीने आपलं मत नोंदवलं.



Common Jezebel

महाराष्ट्र राज्यातून सर्वाधिक म्हणजे १८,००० पेक्षा जास्त नागरिकांनी मतदान केलं ही विशेष आनंदाची गोष्ट आहे. मुळात राष्ट्रीय फुलपाखरू का असावं ? याबाबत चे काही विचार खालील प्रमाणे :-

राष्ट्रीय फुलपाखरू घोषित केल्यास भारतामध्ये पर्यटनासाठी एक मोठी संधी निर्माण होईल. जगभरातील फुलपाखरूप्रेमी या निमित्ताने पर्यटनाकरता भारतामध्ये येतील. साहजिकच अनेक गरजू लोकांना यातून रोजगार उपलब्ध होईल. परकीय चलन आपल्या देशाला प्राप्त होईल.

सध्या फुलपाखरांच्या संख्येमध्ये खूप मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे फुलपाखरू संवर्धन आणि संरक्षणाकरता जनजागृती होण्यास या राष्ट्रीय प्रतीकामुळे खूप जास्त मदत होईल. तुलनेने दुर्लक्षित असलेला हा कीटक पर्यावरण प्रेमी नागरिकांचं लक्ष वेधून घेईल.

अनेक वनांमध्ये इतर राष्ट्रीय प्रतीकांबरोबरच झळकण्याचा मान फुलपाखरालाही मिळेल. भारताचे शेजारी राष्ट्र भूतान यांनी सुमारे तीन वर्षांपूर्वी याच पद्धतीने राष्ट्रीय फुलपाखरू घोषित केलं. त्याचं नाव आहे भूतान ग्लोरी.

या राष्ट्रीय प्रतीकाचा सकारात्मक परिणाम त्यांच्या पर्यटनावर झाल्याचे निदर्शनाला आलं आहे. भूतान देशात अनेक आंतरराष्ट्रीय पर्यटक भूतान ग्लोरी फुलपाखरू पाहण्यासाठी गर्दी करत आहेत. भारतात देखील फुलपाखरू प्रेमींनी हा अनोखा सकारात्मक प्रयत्न, ऑनलाईन पद्धतीने केला आणि त्यानंतर भारतीय सरकारच्या, पर्यावरण मंत्रालयास सविस्तरपणे सादर केला. आता साऱ्या फुलपाखरूप्रेमींचे लक्ष भारत सरकारकडे लागून राहिलंय.

– श्री. दिवाकर ठोंबरे

# THE BIG BUTTERFLY MONTH

The Big Butterfly Month is a celebration of butterflies aimed at conducting a nationwide citizen science survey to help us assess the health of our environment. In the month of September population of butterfly is on peak therefore we celebrates this month as a Big Butterfly Month (BBM). A first of its kind event to be launched on 5th September 2020. Every year celebrates month of September as a Big Butterfly Month.

Butterflies have always been a subject of interest for children, naturalists and scientist because of their beautiful coloration. Butterflies play a vital role in the ecosystem. They act as a food source for various other organisms such as spiders, wasps, dragonflies, birds and lizards. Butterflies are sensitive biota severely affected by the environmental variations and changes in the forest structure as they are closely dependent on plants. They are good pollinator of plant.

The aim of the Big Butterfly Month: India 2020 is to bring the citizens of the country together under the umbrella of butterfly lovers to preserve the current habitat and to build new habitats for butterflies. In the process, diverse ecosystems may get improved as havens for our native biodiversity, which is very much needed. Needless to say that the conservation of biodiversity is of great current concern. Before planning and adapting conservation strategies documentation of biodiversity is very important step.

The popularity and scope of citizen science appears almost limitless. For citizens, the motivation is to contribute to science, public information and conservation with their strength in numbers, unmatched enthusiasm and a broad geographic spread. Scientists, on their part, offer a systematic way to collect information in a strong scientific framework and on a scale that would otherwise not be possible.

Big Butterfly Month would be the first of its kind in India where butterfly experts, enthusiasts and organizations across India are joining hands for a month-long event.

In September month various activities such as Big Butterfly Count, Butterfly Online Workshops, Butterfly Gardening Workshop and contests on Butterfly Photography, Butterfly Journaling, Butterfly Quiz, Butterfly Videography, and Butterfly Lifecycle, will be conducted. Butterfly Origami and webinars on butterflies for school and colleges will also be conducted on a virtual platform, in keeping with the current COVID scenario.

The Big Butterfly Month is being held on an all-India level, where the participants would collect the data in their backyard of the species of butterflies that are seen. Education materials would be distributed through free-to-share media such as YouTube and state/regional level mentors guiding in the identification process. For the first time in India, more than 27programmes working in the field of Biodiversity and its conservation have come

together towards the common goal of involving citizens in large scale monitoring programs.

The celebration would also include competitions and institutional outreach programs through the virtual media educating and sensitizing people about butterflies. Such programs will be conducted in all the major cities, e.g., Delhi, Mumbai, Pune, Bengaluru, Kolkata, Dehradun, Ahmedabad, Guwahati, Jammu, Nagpur and Chennai, as well as reach out to protected areas around central India, Himalaya and the northeastern states of our country.

This year the Big Butterfly Count would be held on an all-India level in September month where all participants would be encouraged to log in their submissions into our well-established and preferred citizen science digital platforms: Butterflies of India, iNaturalist, and India Biodiversity Portal.

**- Dr. Ashish D. Tiple**
Head, P G Dept. of Zoology
Dr. R. G. Bhoyar Arts, Commerce and Science College, Seloo, Wardha



# निसर्गाचा रंगीत ध्रुवतारा



नभांगणातील ध्रुवताऱ्याप्रमाणे निसर्गामध्ये अस्तित्वात असणाऱ्या अनेक जीवप्रजातींपैकी लोभस वलय असणारी जीवप्रजाती म्हणजे फुलपाखरू; त्याची रंगसंगती, चंचलता, मोहकता अशा एक ना अनेक वैशिष्ट्यांमुळे त्याचे अस्तित्व आपल्या सर्वांमध्ये उत्साहाचे स्फुल्लिंग चेतवत राहते. अशा या सर्वांगसुंदर फुलपाखरांनी अनेकवेळा आपल्या साहित्यिकांनाही मोहात पाडले आहे.

ही कविता तर सर्वांना माहित असेलच? ''फुलपाखरू, छान किती दिसते फुलपाखरू.. या वेलींवर फुलांबरोबर गोड किती हसते फुलपाखरू'' या अशा सुंदर किटकाच्या संपूर्ण जगामध्ये १७,५०० ते १८,००० प्रजाती आढळून येतात. त्यापैकी आपल्या देशामध्ये १५००च्या आसपास प्रजाती आहेत. महाराष्ट्राच्या वनसंपत्तीमधील कोहिनूर असलेल्या सह्याद्री पर्वतरांगेमध्ये फुलपाखरांच्या अनेक स्थानविशिष्ट प्रजाती आढळून येतात.

या मासिकाच्या माध्यमातून आपण आपल्या निसर्गात असणाऱ्या मोठ्या फुलपाखरांचे (Big Butterfly) अस्तित्व उत्साहाने साजरे करीत आहोत. आता मोठे फुलपाखरू कोणास म्हणावे, तर ज्यांच्या पंखांची लांबी (Wingspan) जास्त आहे. पंखांची लांबी म्हणजेच Wingspan मोजमापाच्या मुख्यत्वे दोन पध्दती आहेत. एक म्हणजे पंखाच्या समोरच्या भागाच्या आडव्या सरळ रेषेतील लांबीचे मोजमाप करणे. तसेच दुसरी पद्धत म्हणजे फुलपाखराच्या डोक्याच्या (Head) भागाखाली असणाऱ्या Thorax या भागाच्या केंद्रापासून समोरच्या पंखांच्या (Forewing) टोकापर्यंतचे अंतर मोजून त्याची दुप्पट करणे ही होय. या मोजणीपध्दतींच्या अनुषंगाने अशा नाजूक सुंदर फुलपाखरांतील मोठी फुलपाखरे कोणती असा प्रश्न आल्यास त्याची उत्तरे आपणास पुढील माहितीमधून विविधप्रकारे मिळू शकतील.

जगात आढळणारे सर्वात मोठे फुलपाखरू म्हणजे "Queen Alexandra's Birdwing (*Ornithoptera Alexandrae*)" ज्याच्या पंखांची लांबी तब्बल ३० सेंटिमीटर इतकी आहे. भारतातील "Himalayan Golden Birdwing" (*Triodes aeacus*) हे देशातील सर्वात मोठे फुलपाखरू आहे, ज्याच्या पंखांची लांबी (Wingspan) १९४ मि.मी. (१९.४ सेमी) इतकी आहे. ते दीदीहाट, उत्तराखंड येथे आढळून आले आहे. महाराष्ट्र राज्याचा विचार करता "Blue Mormon" (*Papilio polymnestor*) हे सर्वात मोठे फुलपाखरू आहे. यास महाराष्ट्राचे राज्य फुलपाखरू असा दर्जा मिळालेला आहे. राज्य फुलपाखरू असा दर्जा मिळणारे हे भारतातील पहिले फुलपाखरू आहे. हे मुख्यत्वेकरून पश्चिम घाट क्षेत्रात तसेच दक्षिण भारत व श्रीलंकेत आढळून येते. याच्या पंखांची लांबी (Wingspan) १२० ते १५० मि.मी. (१२ ते १५ सेमी) असून हे भारतातील चौथे सर्वात मोठे फुलपाखरू आहे.

सद्यस्थितीत भारतातील महाराष्ट्रासहित सहा राज्यांनी आपले राज्य फुलपाखरू जाहीर केले आहे. त्यामध्ये महाराष्ट्राव्यतिरिक्त उत्तराखंड, केरळ, अरुणाचल प्रदेश, कर्नाटक व तामिळनाडू या ६ राज्यांचा समावेश आहे. यामध्ये Southern Birdwing or Sahyadri Birdwing (*Triodes minos*) या पश्चिम घाट क्षेत्रात व दक्षिण भारतात आढळणाऱ्या तसेच भारतातील दुसरे मोठे फुलपाखरु असणाऱ्या फुलपाखरास कर्नाटक राज्याने राज्य फुलपाखराचा दर्जा दिलेला आहे.

इथे आपण मोठ्या फुलपाखरांची (Big Butterfly) चर्चा केली, परंतु त्यांचा जीवनकाल १५ ते २९ दिवस इतकाच असतो, जो त्यांच्या सुंदरतेबरोबरच जीवनाच्या क्षणभंगुरतेचीही साक्ष आपणास देतो. सध्या जगामध्ये फुलपाखरांच्या अधिवासांच्या ऱ्हासामुळे तसेच फुलपाखरांना पोषक असणाऱ्या वातावरणात विपरीत बदल झाल्यामुळे त्यांचे प्रमाण कमी होत आहे. त्याचबरोबर फुलपाखरांच्या अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या उंबरठ्यावर आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी निसर्गाच्या या रंगीत ध्रुवताऱ्यास निसर्गाच्या क्षितिजावर असेच चमकत ठेवण्याची या मासिकाच्या प्रकाशनाचे औचित्य साधून प्रतिज्ञा घेऊया!

जय हिंद!

**- निखिल व्यंकटराव पाटील**
प्रशिक्षणार्थी वनपरिक्षेत्र अधिकारी
चंद्रमा

# मॅच

(फुलपाखरू जितके सुंदर व आकर्षक तितकेच त्याचे आयुष्यही नाजूक व अनिश्चिततेने भरलेले असते. आक्रमण सोडा पण बचावाचीही पुरेशी साधन सामुग्री नसतानासुद्धा हा नाजूक जीव अंडी, अळी, कोष अशा अवस्था पार करून फुलपाखरात रुपांतरित होतो. शाळेत जीवशास्त्रात साचेबद्ध व समर्पकपणे शिकलेल्या ह्या फुलपाखराच्या जीवनचक्राच्या गोष्टीत थोडे रंग भरून मनोरंजक करण्याचा हा एक प्रयत्न.)

क्रिकेटची मॅच म्हणजे उत्कंठा, अटीतटी, अनिश्चितता आणि टेन्शन यांनी पुरेपूर भरलेला अनुभव. बहुधा त्यामुळेच ती बघायला मजा येते. अशीच एक अटीतटीची मॅच मी आमच्या टेरेसवर अनुभवली. तीच अनिश्चितता, तीच उत्कंठा आणि तसाच रोमहर्षक शेवट.

एक दिवस एक छोटेसे फुलपाखरू आमच्या टेरेसवर आले व सोनटक्क्याच्या झाडावर १०-१२ अंडी घालून उडून गेले. आणि मॅचला सुरूवात झाली. टीम कोणत्या आणि कसली मॅच? तर, एक टीम होती फुलपाखराची व दुसरी बाकी निसर्गातील सगळ्या गोष्टी म्हणजेच शेष विश्व. आणि मॅच होती मोठे होण्याची व जगण्याची. पिच होते सोनटक्क्याचे झाड, आणि स्टेडियम म्हणजे आमची टेरेस व एकमात्र प्रेक्षक मी. जवळ जवळ एक महिना दिवसरात्र चाललेली मॅच खूप काही शिकवून गेली. छान अनुभव देऊन गेली.

फुलपाखराच्या टीममधे सगळेच नवखे आणि समोरच्या टीममधे ऊन, वारा, पाऊस यासारखे खंदे ओपनिंग बॉलर. मग काय! एक दोन तर भोपळाही न फोडता म्हणजे अंड्यातच आऊट झाले. सुरुवात तर काही छान नाही झाली फुलपाखरू टीमची. पण नंतरच्या बॅट्समननी सावध खेळायला सुरूवात केली. पानाची गुंडाळी करून त्यात सुरक्षित राहून स्वतःची क्रिझ आखून घेतली व त्याबाहेर शक्यतो जाणार नाही याची काळजी घेऊन रन बनवायला म्हणजे पाने खायला सुरूवात केली. एक तर हिट विकेट आऊट होणार असेच वाटत होते कारण पान खाता खाता अळी पानाच्या टोकाकडे गेली व देठाकडचा बराचसा भाग खाऊन टाकला. अजून थोडा खाल्ला असता तर पानाबरोबर अळी खाली पडून शेखचिल्ली झाली असती. पण सुदैवाने असे काही झाले नाही.

स्कोअर वाढू लागला तशी मॅचमधली मजाही वाढू लागली अन एक अनपेक्षित धक्का बसला. एक चांगला बॅट्समन पुढे येऊन मारायला गेला अन क्रिझ आऊट झाला. बाहेर आलेल्या अळीला एका कोळ्याने बरोबर पकडले व त्यातून सुटका केवळ अशक्य. असाच एक प्लेअर दोन तीन मुंग्यांमुळे रन आऊट झाला. पुन्हा एकदा टेन्शन व काळजीचे वातावरण.

बाकीचे प्लेअर टिकून होते हळूहळू स्कोअर व त्यांचा आकार वाढत होता. मॅच तशी दिवस रात्र चालू होती माझी सगळी कामं सांभाळून बॉल टू बॉल मॅच बघणं शक्य नव्हतं. एका दिवशी सकाळी बघितलं तर अजून एक गडी बाद झाला होता. बहुदा रात्रीच्या पालीने त्याच्या स्टंप्स उडवल्या होत्या. त्यानंतर एके दिवशी संध्याकाळी बघतो तर सकाळचे दोन गडी गायब. बुलबुल किंवा मैना किंवा लेग स्पिनर चपळ गोलंदाज शिंपी यांच्यापैकी कोणाचे तरी हे काम असणार असा मी अंदाज केला.

आता मोजकेच प्लेअर राहिले होते. पिचही खेळून खेळून खराब झाले होते व रन बनवणे (पाने शोधून शोधून खाणे) अवघड होत होते. माझी काळजी वाढत होती. पण एक प्रेक्षक म्हणून सर्व खेळ बघत असल्याने त्यात मी फिक्सिंग किंवा हुल्लडबाजी करून मॅचमध्ये व्यत्यय आणणार नव्हतो. अशातच एक प्लेअर नर्वस नाईंटी मधे पोहोचला (अळीचा कोष झाला). वा! दिल खूष हो गया! अशा अवघड पिचवर व बलाढ्य संघाविरुद्ध असा खेळ खरंच कौतुकास्पद होता.

पण पुन्हा गोची झाली. त्याचा स्कोअर काही पुढे सरकेना आणि अशातच एक जोरदार अपील झाले व थर्ड अंपायरनी रिप्ले बघून त्याला आऊट दिले. (कोष तयार झाला खरा पण अळीच्या अवस्थेत असतानाच त्यावर वास्प प्रकारच्या माशीने अंडी घातली होती व बाहेरून अळी वाढून कोष झाला पण आत त्या वास्पचेही अनेक कोष तयार होत होते) टॉर्चच्या प्रकाशात कोषातील कोष स्पष्ट दिसत होते. अखेर फुलपाखराचा कोष मरून गेला व त्यातून काही डझन वास्पच्या माशा बाहेर पडल्या.

पुन्हा निराशा, टेन्शन, फिंगर्स क्रॉस्ड म्हणतात तसे झाले. आता दोन तीनच खेळाडूच राहिले होते. फुलपाखरू मॅच हरणार असे वाटू लागले अन बघता बघता एका बॅट्समनने सेंचुरी मारली. दुसराही त्याच्यामागून शतकाच्या उंबरठ्यावर पोहोचला व त्यानेही एकदम झोकात शतक पूर्ण केले. अगदी विथ फ्लाईंग कलर्स म्हणतात अगदी तसे आणि महिनाभर चाललेली ही रोमहर्षक मॅच अखेर संपली. मॅन ऑफ दोन मॅच पुरस्कार अर्थातच शतकवीराला मिळाला.

आता तुम्ही म्हणाल कोण जिंकले? तर अशा या निसर्गाबरोबरच्या मॅचमधे हार जीत नसते काही वेळा फुलपाखरू वरचढ तर कधी निसर्ग जिंकणार असे वाटते. पण सरतेशेवटी मॅच कायम ड्रॉ होत असते. पुन्हा काही दिवसांनी हेच शतकवीर त्यांची अकादमी सुरू करतील आणि परत अशीच एक अटीतटीची मॅच अजून एखाद्या सोनटक्क्याच्या मैदानावर सुरू होईल. माझा प्रयत्न चालू आहे की माझे सोनटक्क्याचे मैदान तोपर्यंत परत हिरवेगार होईल व अशीच एखादी रोमहर्षक मॅच मला पुन्हा एकदा घरबसल्या बघता येईल.

**- डॉ. संजय दाते**



# फुलपाखरु

ज्याला रंगांची भूल पडली नाही, असं मूल शोधून सापडणार नाही. म्हणूनच इंद्रधनुष्य आणि फूलपाखरु यात लहान लेकरू रमतंच. दोहोंमध्ये रंगांचा खेळ आणि मेळ. लहानपणी फुलपाखराशी खेळत मुलं मोठी होतात, आयुष्यातलं बालपण विरत जातं, खेळणारं-बागडणारं मूल मोठं होऊन धावायला लागतं. बालपण सरतं आणि माणसं निर्माण होत जातात. आयुष्याच्या धामधुमीत मग फुलपाखरं कधीच मागं पडतात. आपण धावत राहतो. असं का व्हावं ? याला उत्तर नाही.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांच्याकडून ऐकलेला एक किस्सा मला नेहमी आठवतो. ''निसर्गाविषयी इतकं प्रेम तुमच्यात कसं निर्माण झालं ? असा प्रश्न श्री. बराक ओबामा यांनी प्रख्यात जीवशास्त्रज्ञ आणि माहितीपट निर्माते सर डेव्हिड ॲटनबरो यांना विचारला होता. याचं फार सुंदर उत्तर त्यांना मिळालं. सर ॲटनबरो म्हणाले, निसर्गामध्ये रस नसणारं एकही मूल अजून मी पाहिलं नाही. प्रश्न मुळात असा आहे की हा रस नंतर संपतो कसा ?''

याचं उत्तर प्रत्येकानं आपल्यामध्ये शोधावं. प्रत्येकाचा शोध वेगळाच असेल. आणि समजा तुमच्यात हा रस अजून टिकून आहे, अजून तुमच्या मनात निसर्गाचे रंग भरलेलं मखमली फुलपाखरू भिरभिरत असेल तर उत्तमच. तर हा रस असलेल्या आणि नसलेल्या प्रत्येक वाचकापर्यंत पोहोचण्यासाठी हा सारा प्रपंच.

खरं तर फुलपाखराचं आयुष्य अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण. आधी अंडं, ज्याचं अस्तित्व कधी कोणाच्या लक्षातही येत नाही. मग अळी. ही अवस्था म्हणजे फुलपाखराच्या आयुष्यातली सर्वात कठीण. पक्षी वगैरे खातात ते ठीक. पण एरवी फुलपाखराचं कौतुक करणारी बहुसंख्य जनतासुद्धा अळी अंगावर आली की भयभीत होते. या अळीचा नंतर कोष होतो. याही निश्चल अवस्थेत कोणाचं लक्ष इकडं नसतंच. फुलपाखराचे जे काही अमाप लाड होतात ते कोषातून बाहेर आल्यावरच. ही सारी अवस्थांतरं पाहणं हा एक अद्भुत अनुभव असतो. पण जो पाहिल त्यासाठीच.

आपणही एक छोटा फेरफटका घेऊयात. अंजन कांचन करवंदीच्या काटेरी आणि बकुलफुलांच्या प्राजक्ताच्या दळदारी महाराष्ट्राचं अर्ध जंगल विदर्भात. चंद्रपूरात वनसंपत्ती विपुल. अर्थात जैवविविधता नाना तऱ्हेची. त्यामुळं तऱ्हे-तऱ्हेची फुलपाखरं कित्येक असणं ओघानं आलंच. यातल्या काही निवडक फुलपाखरांचं आपण इथं दर्शन घेऊयात.

**- शतानिक भागवत**



Zebra Blue, Tawney coster, Common Lime, Common Nawab, Blue Mormon, Banded peacock, White Orange tip, Yellow orange tip, Common Pierrot, Palm fly, Tailed Jay, Angled sunbeam, Bispot Banded Ace, Orange tip, Black Rajah, Tawney Rajah

# आंतरराष्ट्रीय ओझोन दिन

## १६ सप्टेंबर

ओझोन वायूचा थर सूर्यकिरणांमधील सजीव आणि पृथ्वीसाठी हानिकारक अतिनील किरण आणि इतर तीव्र किरणांपासून पृथ्वीचे रक्षण करतो. यामुळे पृथ्वीवरील जीवन जपण्यास मदत होते.

मात्र बऱ्याच कारणांनी दिवसेंदिवस विरळ होत चाललेल्या ओझोन आवरणाविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि ओझोनच्या थराचे जतन करण्यासाठी शक्य ते उपाय शोधण्यासाठी 'जागतिक ओझोन दिन' दरवर्षी १६ सप्टेंबरला साजरा केला जातो. 'झाडे लावली पाहिजेत आणि परसबागांना प्रोत्साहन दिले पाहिजे' (Trees should be planted, and backyard gardening should be encouraged) ही यंदाची २०२२ वर्षाच्या जागतिक ओझोन दिनाची संकल्पना आहे.

जागतिक हवामान बदल तसेच उष्णतावाढीच्या पार्श्वभूमीवर ओझोनचे आवरण वाचवण्यासाठी अधिकाधिक सक्रिय प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे.

ओझोन थर आणखी खालावण्यापासून वाचविण्यासाठी सर्व नागरिकांनी पुढील बाबी लक्षात ठेवणे व अंमलात आणणे आवश्यक आहे:

१. वाहनांचा आवश्यकतेनुसार वापर करावा: वाहनांमधून निघणार्या धुरामुळे प्रदूषण होते. वाहनांमुळे होणारे प्रदूषण ओझोनसाठी घातक आहे. हे टाळण्यासाठी, आवश्यकता नसताना वाहने वापरणे टाळावे. शक्य तेथे सायकल वापरणे, चालणे किंवा वैयक्तिक वाहन वापरण्याऐवजी सार्वजनिक वाहतूकीचा वापर करणे आवश्यक आहे.

२. पुनर्वापरयोग्य वस्तुंचा वापर करणे: कोरडा आणि सेंद्रीय कचरा वेगळा करा आणि नंतर त्याचा पुनर्वापर करण्याच्या दृष्टीने आवश्यक पावले उचलावीत. शक्यतो पॉलिथीन तसेच प्लास्टिक वापरणे पूर्णपणे टाळावे. त्याऐवजी पुन्हा वापरण्यायोग्य आणि पुनर्वापर करण्यायोग्य कागदी किंवा कापडी पिशव्यांचा वापर करावा.

३. पर्यावरणपूरक (इको-फ्रेन्डली) उत्पादने खरेदी करा: विविध उत्पादनांमधून बाहेर पडलेली विषारी रसायने ओझोन थराला हानी पोहोचवतात. सबब ज्यूट पिशव्या, पुन्हा वापरता येण्याजोगे कंटेनर आणि इतर पर्यावरणपूरक उत्पादने खरेदी करून हा धोका रोखण्याचा प्रयत्न करावा.

४. रासायनिक किटकनाशकांचा वापर टाळा: कीटकनाशके केवळ प्राणीच नव्हे तर, मानवांसाठीदेखील सर्वात हानिकारक असतात. त्यामुळे रासायनिक किटकनाशकांचा वापर थांबवायला हवा. तसेच वनस्पतींचे रक्षण करण्यासाठी नैसर्गिक उपायांचा वापर करण्याची गरज आहे.

५. रेफ्रिजरेटर, एअर कंडिशनर आणि इतर उपकरणे जबाबदारीने वापरा. उपकरणांची नियमितपणे सर्व्हिसिंग केल्याने आणि त्यांची विल्हेवाट लावताना सावधगिरी बाळगल्याने उत्सर्जन कमी होण्यास आणि ओझोनचे संरक्षण करण्यात मदत होते.

६. पर्यावरणास आणि आपल्यासाठी हानिकारक असलेली स्वच्छता उत्पादने वापरू नका. बऱ्याच स्वच्छता उत्पादनांमध्ये सॉल्व्हेंट्स आणि गंजणारे पदार्थ असतात, परंतु आपण हे धोकादायक पदार्थ व्हिनेगर किंवा बायकार्बोनेट सारख्या गैर-विषारी उत्पादनांसह बदलू शकतो. किंवा नैसर्गिक पदार्थांपासून बनवलेली स्वच्छता उत्पादने देखील वापरु शकतो.

७. सीएफसी उत्सर्जित करणारी उत्पादने टाळा: काही ओझोन कमी करणारे वायू सौंदर्य प्रसाधने, हेअरस्प्रे, खोलीतील ताजेपणा आणि साफसफाईच्या उत्पादनांमध्ये वापरले जातात. आपण हायड्रोक्लोरोफ्लोरोकार्बन्स (HCFCs), हॅलोजनेटेड हायड्रोकार्बन्स, मिथाइल ब्रोमाइड आणि नायट्रस ऑक्साईड असलेली उत्पादने टाळू शकतो.

८. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी ऊर्जा-कार्यक्षम उत्पादने बनवणाऱ्या गैर सरकारी संस्था (NGO) यांना तुम्ही मदत करू शकता. उदाहरणार्थ, टेक्नॉलॉजी इन्फॉर्मेटिक्स डिझाईन एन्डेव्हर (TIDE), नाविन्यपूर्ण कूकस्टोव्ह आणि इतर पर्यावरणास अनुकूल उत्पादने आणून, सरपण वापर कमी केला आहे आणि कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन मोठ्या प्रमाणात कमी करण्यात मदत केली आहे.

९. मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यासोबत पर्यावरणाचे संरक्षण करायला हवे.

१०. पृथ्वीसाठी अतिशय उपयुक्त असलेले ओझोनचे आवरण कमी करणाऱ्या किंवा क्षीण करणाऱ्या पदार्थांचा वापर टाळणे किंवा नियंत्रित करणे देखील आवश्यक आहे.

वरील बाबी लक्षात ठेवून कार्यवाही केल्यास ओझोन थर वाचविण्यात आपण यशस्वी ठरु व तरच ओझोन थर आपल्यासह भविष्यातील पिढ्यांसाठीचेही संरक्षण करू शकेल.

**- प्रशांत खैरनार**
प्रशिक्षणार्थी वनपरिक्षेत्र अधिकारी
चंद्रमा



**"Chandrama"** is published by the Chandrapur Forest Academy of Administration, Development and Management, Chandrapur and printed at Renuka Publications, Chandrapur. The views and opinions expressed in the articles are those of the authors and do not necessarily reflect the official policy or position of the publisher.
Reproduction of any content is not allowed without a written permission of the publisher.
Please share your feedback / inputs on **chandrama.cfa@gmail.com**

**Editor in Chief : Maheep Gupta**, APCCF & Director, Chandrama | **Executive Editor : Piyusha Pramod Jagtap**, Addl. Director (Training) |
**Editor : Manisha Bhinge**, Dy Director | **Guest Editor : Shatanik Bhagwat**, DFO